आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२३ ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी जळगाव इथल्या कार्यक्रमात ११ लाख लखपती दीदींशी संवाद साधणार
- लाडकी बहीण योजनेसह सुरक्षित बहीण योजनाही राबवण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
- भारताला आत्मनिर्भरतेच्या दिशेनं पुढे नेण्यात मुंबईची भूमिका मोठी असल्याचं केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांचं प्रतिपादन
- महाराष्ट्र बंदला मुंबई उच्च न्यायालयाची मनाई, महाविकास आघाडीनं उद्याचा बंद मागं घेतल्याची काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची घोषणा

  **आणि**
- पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन देशभरात विविध कार्यक्रमांनी साजरा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी जळगाव इथं येणार आहेत. त्यावेळी ११ लाख लखपती दीदींना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत. वर्षाला एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न कमावणाऱ्या लखपती दीदींबरोबर ते यावेळी  संवाद साधतील. राज्यातल्या स्वयंसहाय्यता गटांसाठी अडीच हजार कोटी रुपयांचा फिरता निधी जारी करतील. तसंच पाच हजार कोटी रुपयांचं बँक कर्ज जारी करतील. या फिरत्या निधीचा फायदा २ लाख ३५ हजार चारशे स्वयंसहाय्यता गटांच्या सुमारे २५ लाख ८० हजार सदस्यांना मिळणार आहे. ३४ राज्यांमधल्या जवळजवळ ३० हजार ठिकाणांहून या कार्यक्रमात लखपती दीदी दूरदृष्यप्रणाली द्वारे सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठी लाडकी बहिण योजनेबरोबरच आता सुरक्षित बहिण योजनाही राबवली जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. ते नाशिकमधे महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत आयोजित महिला महाशिबीरात बोलत होते. आगामी विधानसभा निवडणुकीनंतरही लाडकी बहीण योजना चालू राहील, तसंच ऑगस्ट महिन्याची मुदत संपल्यानंतरही सप्टेंबरमध्ये अर्ज भरणाऱ्या बहिणींना देखील आर्थिक मदत दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे आणि अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मनोगत व्यक्त केलं.

**<><><><><>**

भारताला आत्मनिर्भरतेच्या दिशेनं पुढे नेण्यात मुंबईची भूमिका मोठी असल्याचं प्रतिपादन केंद्रीय बंदरं, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी आज मुंबईत केलं. मुंबई बंदर प्राधिकरणाचे विविध प्रकल्पांचं उद्घाटन सोनोवाल यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. हे प्रकल्प आणि सामंजस्य करार मुंबई बंदर प्राधिकरणाचं काम बदलत्या काळाच्या मागणीनुसार सुरू असल्याचं द्योतक आहे, असं सोनोवाल यांनी सांगितलं.

पीर पाऊ इथं थर्ड केमिकल बर्थ, जवाहर द्वीप इथं किनारा संरक्षण आणि पुनर्प्राप्ती प्रकल्प यासह इतर प्रकल्पांचं उद्घाटन सोनोवाल यांनी केलं. तसंच बंदरं आणि दळणवळणाच्या कामांमध्ये हरित इंधन प्रणाली विकसित करणं, उत्सर्जन व्यवस्थापन, कार्बन उत्सर्जन कमी करणं, डिजिटायजेशन इत्यादी विषयांवरचे सामंजस्य करार यावेळी झाले. त्यानंतर आजच्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या

निमित्तानं मुंबई बंदरात उभ्या असलेल्या सर्व नौकांनी हॉर्न वाजवून सर्व अंतराळ संशोधकांचा सन्मान केला.

**<><><><>**

बदलापूर इथल्या लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडीला उद्या महाराष्ट्र बंद करायला मुंबई उच्च न्यायालयानं मनाई केली आहे. उद्याच्या महाराष्ट्र बंद विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या पीठासमोर या याचिकेवर आज तातडीनं सुनावणी पार पडली. कोणत्याही राजकीय पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नसल्याचं न्यायालयानं यावेळी स्पष्ट केलं. या प्रकरणी न्यायालयानं महाविकास आघाडीचे घटक पक्ष, राज्य सरकार आणि गृहविभागाला नोटीस बजावली असून त्यात न्यायालयानं दिलेल्या आदेशांचं पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><>**

यासंदर्भात न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखून कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. नाशिकमध्ये बातमीदाराशी बोलताना त्यांनी सांगितलं, की बदलापूरची घटना अत्यंत दुर्दैवी आहे, मात्र, त्यावर होत असलेलं राजकारण त्याही पेक्षा दुर्दैवी आहे.

नेपाळमधल्या बस दुर्घटनेत जळगावमधल्या नागरीकांचा मृत्यू झाला आहे. यासंदर्भात नेपाळमध्ये आमदार आणि अधिकारी पाठवून तातडीनं मदत केली जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

या दुर्घटनेबाबत तातडीनं दखल घेण्याचे आदेश मुख्य सचिवांना दिले असून नेपाळ सरकारशी समन्वय साधला असल्याचं तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस

यांनी सांगितलं. नेपाळ दुर्घटनेतल्या नागरीकांना सर्व प्रकारची मदत केली जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

न्यायालयाच्या निर्णयानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या आवाहनानुसार महाविकास आघाडीनं उद्या पुकारलेला बंद मागे घेतल्याचं जाहीर केलं आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील या नेत्यांशी चर्चा करून हा निर्णय घेतल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बातमीदारांना दिली. बंद मागे घेतला तरी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते विविध ठिकाणी काळ्या फिती लावून एक तास आंदोलन करणार असल्याचंही पटोले यावेळी म्हणाले. तत्पूर्वी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून बंद मागे घेण्याचं आवाहन केलं होतं. ते उद्या पुण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर बसून निषेध करणार आहेत.

<><><><><>

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन आज साजरा झाला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर गेल्या वर्षी याच दिवशी भारताचं चांद्रयान उतरलं होतं. या प्रीत्यर्थ देशभरात अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहभागी झाल्या होत्या. भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोने अंतराळ क्षेत्रातल्या प्रगतीमधे केलेल्या कामगिरीचा त्यांनी गौरव केला. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते इस्त्रोच्या रोबोटिक चॅलेंज आणि भारतीय अंतरिक्ष हॅकेथॉनच्या विजेत्यांना परितोषिके प्रदान करण्यात आली.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून देशवासियांना पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या शुभेच्छा दिल्या . प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आजचा दिवस भारतीय अंतराळ शास्त्रज्ञांच्या योगदानाची प्रशंसा करण्याचा आहे. सरकारनं या क्षेत्राशी संबंधित दूरदृष्टीचे निर्णय घेतले आहेत आणि आगामी काळातही घेऊ असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११३ वा भाग असेल.

**<><><><><>**

शाळेतल्या सुरक्षेसंदर्भात केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं नवे दिशानिर्देश जारी केले आहेत. शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी निश्चित करण्याबाबतच्या तरतुदींचा त्यात समावेश आहे. या निर्देशांमध्ये प्रतिबंधात्मक तरतुदी, विविध संबधित घटकांची जबाबदारी निश्चिती, प्रक्रिया अहवाल, संबधित कायदेशीर तरतुदी, सहाय्य आणि समुपदेशन याबरोबरच सुरक्षित वातावरण याचे मापदंड यावर भर दिला आहे.

**<><><><><>**

नेपाळमध्ये बस नदीत पडून झालेल्या अपघातात २७ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये भारतीय नागरिकांचा समावेश आहे. अपघातातील १६ प्रवाशांना वाचवलं असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही बस पोखराहून काठमांडूला

जात होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या बसमध्ये सुमारे ४० भारतीय प्रवासी होते. पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले असून मदतकार्य सुरू आहे.

**<><><><><>**

**धुळे** जिल्ह्यात आज दुपारपासून जोरदार पाऊस झाला. पावसामुळे धुळे आणि साक्री तालुक्यातल्या जल प्रकल्पांमध्ये पाण्याची पातळी वाढली आहे. मालनगांव, पांझरा, जामखेली प्रकल्प भरले असून त्यातून पाण्याचा विसर्ग होत आहे. अक्कलपाडा धरणातून आज दुपारी २४०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. पांझरा नदीला पुन्हा एकदा पूर आला असून नदीकाठच्या नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**जालना** जिल्ह्यातही आज सकाळपासून ढगाळ वातावरण आहे. भोकरदन तालुक्यात काल रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे पद्मावती धरणाच्या सांडव्यावरुन पाणी वाहत आहे.

**जळगाव** शहरासह जिल्ह्याच्या काही भागात दुपारी जोरदार तर बहुतांश भागात हलका ते मध्यम पाऊस पडला